(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[१९६१] १ एस. सी. आर. १४८

मद्रास राज्य आणि अन्य एक

वि.

मेसर्स एम.ए. नूर मोहम्मद अँड कंपनी.

(बी. पी. सिन्हा, सरन्यायाधीश, जे. एल. कपूर, पी. बी. गजेंद्र गडकर,

के. सुब्बा राव आणि के. एन. वांचू, न्या. न्या.)

विक्रीकर - कातडे आणि चर्म विक्री - बहुमुखी कर आकारणी पासून सूट - विनापरवाना व्यापारी - एकेरी बिंदु कराचा दावा करू शकतात का - बहुमुखी कर आकारणीची तरतूद करणाऱ्या नियमांची वैधता - मद्रास सर्वसाधारण विक्री कर (उलाढाल आणि मूल्यांकन) नियम, १९३९, नियम १६ (५) - मद्रास सर्वसाधारण विक्री कर अधिनियम, १९३९ (सन १९३९ चा क्र. ९), कलम ३, ५(६), ६ अ.

उत्तरवादी ही एक चर्मशोधन व्यवसाय करणारी संस्था असून ती मद्रास सर्वसाधारण विक्री कर अधिनियम, १९३९ मधील तरतुदींनुसार परवाने काढत असे, पण १९५२-१९५३ या मूल्यांकन वर्षासाठी तिने परवान्याचे नूतनीकरण केले नाही आणि वर्षभरातील कमावलेल्या कातडे आणि चर्म विक्रीच्या मूल्यावर विक्रीकर आकारण्यात आला. अधिनियमाच्या कलम ५ (vi) अन्वये कातडे आणि चर्म विक्री

संदर्भातील विक्री कर देण्याचे दायित्व केवळ एकेरी कराचे असू शकते, मद्रास सर्वसाधारण विक्रीकर (उलाढाल व मूल्यांकन) नियम, १९३९ च्या नियम १६ (५), ज्या अन्वये कर आकारणीच्या या पद्धतीची कार्यवाही परवानाधारक व्यापाऱ्यांपर्यंत मर्यादित होते, तो अधिकारबाह्य होता कारण त्यामुळे कलम ५ (vi) चे उल्लंघन होते आणि व्ही. एम. सय्यद मोहम्मद अँड कंपनी वि. मद्रास राज्य, [१९५४] एस.सी.आर. १११७] या प्रकरणात तसा निर्णय दिला होता आणि ज्या व्यापाऱ्याने परवाना घेतला नव्हता, त्या प्रकरणी कलम ६ ए लागू नव्हते, या कारणांस्तव उच्च न्यायालयात भारताच्या राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अन्वये संस्थेने याचिका दाखल करून मूल्यांकनाच्या आदेशाच्या वैधतेला आव्हान दिले.

असा निर्णय देण्यात आला की, मद्रास सर्वसाधारण विक्री कर अधिनियम, १९३९ च्या कलम ३ नुसार व्यापाऱ्याच्या एकूण उलाढालीवर बहुमुखी कर आकारण्याची तरतूद आहे, परंतु कलम ५ अन्वये काही विशिष्ट वस्तूंच्या विक्री व्यवहाराच्या बाबतीत अपवाद केला जातो, ज्यात काही निर्बंध आणि अटींच्या, ज्यात परवान्यांबाबतीतील अटींचा समावेश आहे, त्यांच्या अधीन राहून एकेरी कर आकारणीची तरतूद करण्यात येते आणि कलम ६ अ अन्वये अटी व निर्बंधांचे पालन न केल्यास, अशा विक्रीला जणू काही कलम ५ च्या तरतुदी लागू नव्हत्या असे मानून, कलम ३ अन्वये कराची आकारणी केली जाते. त्यानुसार, मद्रास सर्वसाधारण विक्री कर (उलाढाल आणि मूल्यांकन) नियम, १९३९ चा नियम १६ (५) अधिकारबाह्य

नाही.

सय्यद महंमद अँड कंपनी वि. आंध्र राज्य, [१९५६] ७ एस.टी.सी. ४६५ आणि म्हैसूर राज्य वि. सरवटुला अँड कंपनी,[१९५७] ९ एस.टी.सी. ५९३, - मंजूर.

व्ही.एम. सय्यद मोहम्मद अँड कंपनी वि. मद्रास राज्य, [१९५७] एस.सी.आर. १११७, स्पष्ट केले.

दिवाणी अपिलीय अधिकारिता : दिवाणी अपील क्र. ३८/१९५९.

रिट याचिका क्र. ३१३/१९५४ मध्ये मद्रास उच्च न्यायालयाच्या दिनांक २ एप्रिल, १९५६ रोजीच्या न्यायनिर्णय व आदेशावरुन विशेष अनुमतीने अपील.

अपीलकर्त्यासाठी आर. गणपथी अय्यर आणि टी. एम. सेन.

उत्तरवादीसाठी सी. के. दफ्तरी, भारताचे महा न्यायअभिकर्ता आणि एस. व्यंकटकृष्णन.

हस्तक्षेपकर्ता क्र. १ (अंबुर टॅनर्स असोसिएशन) साठी ए. व्ही. विश्वनाथ शास्त्री आणि एस. व्यंकटकृष्णन.

हस्तक्षेपकर्ता क्र. २ आणि ३ साठी (आर. चेन्नप्पा आणि पी. अब्दुल वहाब) आर. गोपालकृष्णन.

१२ ऑगस्ट, १९६० न्यायालयाचा न्यायनिर्णय **कपूर, न्या.** यांनी दिला.

राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अन्वये याचिका मंजूर करण्याच्या मद्रास उच्च

न्यायालयाच्या न्यायनिर्णय आणि आदेशाविरुद्ध विशेष अनुमतीने हे अपील करण्यात आले आहे. मद्रास सर्वसाधारण विक्री कर अधिनियम, १९३९ (सन १९३९ चा अधिनियम क्र. ९) अंतर्गत अपीलकर्ता क्रमांक २, उप वाणिज्य विक्रीकर अधिकारी, सैदापेट यांनी केलेल्या विक्रीकराच्या मूल्यांकनाच्या कायदेशीरतेबाबत त्यात प्रश्न उपस्थित केला होता..

उत्तरवादी ही मद्रास शहराजवळील क्रोमपेट येथे चर्मसंस्करणीचा व्यवसाय करणारी एक भागीदारी संस्था होती. मूल्यांकनाच्या वर्षापूर्वी, म्हणजे १९५२-५३ पूर्वी, ती अधिनियमाच्या संबंधित तरतुदींनुसार परवाने काढत असे, परंतु, मूल्यांकन वर्षासाठी तिने परवान्याचे नूतनीकरण केले नव्हते. विवरण देण्याची मागणी केली असता, तिने तसे केले नाही किंवा तिच्यावर दिनांक २८ फेब्रुवारी, १९५४ रोजी बजावलेल्या नोटीशीवर कोणताही आक्षेप घेतला नाही. रु. ६,७७,३७४-४-४ च्या उलाढालीवर रु. १०५८४/- इतक्या विक्री कराची आकारणी करण्यात आली. आदेश बेकायदेशीर होता आणि कायद्याच्या अधिकाराने समर्थित नव्हता, या कारणास्तव संस्थेने राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अन्वये मूल्यांकन रद्द करण्यासाठी याचिका दाखल केली. हा युक्तिवाद उच्च न्यायालयाने मान्य केला आणि खर्चासह याचिका मंजूर करण्यात आली. या निर्णयाचा परिणाम असा होतो की, उत्तरवादी संस्था, जी कायद्यांतर्गत परवानाधारक व्यापारी नाही, ती कातडे आणि चर्म व्यवहारांच्या संदर्भात कोणत्याही विक्री करास पात्र नाही. या न्यायनिर्णया व आदेशाविरोधात

अपीलकर्त्यांनी विशेष अनुमतीने या न्यायालयात धाव घेतली आहे.

उच्च न्यायालयात उत्तरवादी कंपनीचा युक्तिवाद असा होता की, कायद्याच्या कलम ५ च्या खंड (vi) अन्वये, कातडे आणि चर्म संदर्भात विक्री कर भरण्याचे दायित्व केवळ एकेरी बिंदूवर असू शकते; परवानाधारक विक्रेत्यांना या प्रकारच्या करआकारणीच्या पद्धतीचे कामकाज मर्यादित करणारा नियम अधिकारबाह्य होता आणि म्हणूनच मद्रास सर्वसाधारण विक्रीकर (उलाढाल आणि मूल्यांकन) नियम, १९३९, ज्यास यापुढे उलाढाल आणि मूल्यांकन नियम संबोधण्यात आले आहे, चा नियम १६ (५) निरर्थक आणि अप्रवर्ती होते आणि सर्वोच्च न्यायालयाने व्ही. एम. सय्यद मोहम्मद कंपनीमध्ये वि. मद्रास राज्य[1] या प्रकरणात तसा निर्णय दिला होता; ही अर्थउकल स्वीकारून मद्रास राज्याने दिनांक २६ फेब्रुवारी, १९५४ रोजी, म्हणजेच वादाधीन मूल्यांकन आदेश देण्याच्या दोन दिवस आधी, जी. ओ. ४५०, महसूल अन्वये, नियम १६ मधील खंड (५) वगळले; आणि उलाढाल आणि मूल्यांकन नियमांतील नियम १६ (५) ही, विनापरवाना व्यापाऱ्यांच्या कातडे आणि चर्म विक्रीसंदर्भात बहुमुखी कर लादण्याची एकमेव तरतूद होती आणि तो नियम निरसित झाल्यानंतर विक्री कर लादणे बेकायदेशीर होते आणि कर कायद्याच्या अधिकाराशिवाय होता. असाही युक्तिवाद करण्यात आला होता की, या कायद्यांतर्गत कर आकारणी योजनेत कातडे आणि चर्म यांचे आंतरराष्ट्रीय

1 [१९५४] एस. सी. आर. १११७

बाजारपेठेतील महत्त्व लक्षात घेऊन त्यांना कायद्याच्या कलम ३ (१) च्या, जे आकारणीचे सर्वसाधारण कलम आहे, त्या कलमाच्या थेट कार्यवाहीमधून वगळण्यात आले होते आणि त्यांना कलम ५ (vi) अन्वये एकेरी कर आकारणीचे विशेष संरक्षण देण्यात आले होते. त्यामुळे कातडे आणि चर्म विक्रीच्या बाबतीत, सर्वसाधारण तरतूद लागू होत नाही आणि अधिनियमाच्या कलम ५ (vi) अन्वये कर आकारणीसाठी विशेष नियम घालून दिला होता.

उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, कातडे आणि चर्माच्या बाबतीत "कलम ३ द्वारे आकारले जाणारे शुल्क कलम ५ च्या तरतुदींच्या अधीन आहे आणि कातडे आणि चर्माच्या परवानाधारक विक्रेत्यांच्या बाबतीत, शुल्काची तरतूद उलाढाल आणि मूल्यांकन नियमांच्या कलम १६ मध्ये आहे."

उच्च न्यायालयाने पुढे असा निर्णय दिला की, एकेरी कर आकारणीचा लाभ परवानाधारक व्यापाऱ्यांना मर्यादित करणारा, उलाढाल आणि मूल्यांकन नियमांचा नियम १६ (५) हा अधिकारबाह्य होता, कारण त्यामुळे अधिनियमाच्या कलम ५ (vi) चे उल्लंघन होते आणि कातडे व चर्माच्या व्यवहारासाठी परवाना न घेतलेल्या व्यापाऱ्याच्या बाबतीत कलम ६ अ लागू होत नाही आणि तसेच, नियम १६ (५) मुळे कलम ५ (vi) चे उल्लंघन होत असल्यामुळे जर नियम १६ (५) हा अधिकारबाह्य होता, तर मद्रास सर्वसाधारण विक्रीकर नियमांचा (यापुढे विक्री कर नियम असे संबोधण्यात आले आहे) नियम ५, ज्या अन्वये एकेरी कर आकारणीचा लाभ

घेण्यासाठी परवाना काढणे आवश्यक आहे, तो सुद्धा अधिकारबाह्य असेल. अशा प्रकारे, कलम ३ (१) आणि कलम ५ (vi) च्या खऱ्या अन्वयार्थानुसार, असे मत व्यक्त करण्यात आले की, विक्री कर नियमांचा नियम ५ आणि उलाढाल आणि मूल्यांकन नियमांचा नियम १६(५) अधिकारबाह्य होते आणि परवाना न घेतलेल्या व्यक्तीला कलम ६ अ लागू होत नाही. परिणामी, उत्तरवादी संस्थेच्या मूल्यांकनाचा आदेश रद्द करण्यात आला.

या अपिलावर निर्णय घेण्यासाठी या अधिनियमातील संबंधित तरतुदी आणि त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियमांच्या दोन संचांचा संदर्भ घेणे आणि ते विचारात घेणे आवश्यक आहे. ते पुढीलप्रमाणे आहेत :-

कलम ३(१) " या अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून, -

(अ) प्रत्येक व्यापारी प्रत्येक वर्षाच्या त्याच्या एकूण उलाढालीवर अशा वर्षासाठी कर भरेल ; आणि

....

(३) ज्या व्यापाऱ्याची कोणत्याही वर्षातील एकूण उलाढाल दहा हजार रुपयांपेक्षा कमी असेल, त्याला पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये त्या वर्षासाठी कोणताही कर भरावा लागणार नाही.

(४) या कलमाच्या व या अधिनियमातील इतर तरतुदींच्या प्रयोजनासाठी,

विहित करण्यात येतील अशा नियमांनुसार उलाढाल निश्चित करण्यात येईल ;

(५) विहित करण्यात येईल अशा पद्धतीने आणि अशा हप्त्यांमध्ये, पोट-कलम (१) व (२) अन्वये कर निर्धारण, आकारणी आणि संकलन करण्यात येईल;

कलम ५. अशा निर्बंधांच्या आणि विहित करण्यात येतील अशा अटींच्या, परवाने आणि परवाना शुल्काच्या अटींसह, अधीन राहून,

....

(vi) कातडे आणि चर्म विक्री, मग ते कमावलेले असो वा नसो, अनुवर्ती व्यापाऱ्यांनी केलेल्या विक्रीच्या मालिकेतील विहित करण्यात येईल अशा केवळ अशा एकेरी बिंदुवर कलम ३, पोटकलम (१) अन्वये करआकारणीस पात्र असेल.

कलम ६ अ. कलम ५ अन्वये विहित केलेल्या किंवा कलम ६ अंतर्गत अधिसूचित केलेल्या कोणत्याही निर्बंधांचे किंवा अटींचे उल्लंघन केल्यास किंवा एखाद्या व्यापाऱ्याने त्यांचे पालन न केल्यास, किंवा जर अशा प्रकारे विहित किंवा अधिसूचित केलेल्या अटीनुसार परवाना घेणे किंवा नूतनीकरण करणे आवश्यक आहे आणि तरीही, व्यापाऱ्याने परवाना न काढल्यास किंवा नूतनीकरण न केल्यास, किंवा त्याने काढलेल्या किंवा नूतनीकरण केलेल्या परवान्याच्या कोणत्याही अटीचे उल्लंघन केल्यास किंवा त्यांचे पालन न केल्यास, ज्या वर्षाच्या सुरूवातीपासून असे उल्लंघन केले किंवा पालन केले गेले नाही, तेव्हापासून जणू काही कलम ५ मधील तरतुदी किंवा यथास्थिती, कलम ६ अंतर्गत अधिसूचनेच्या तरतुदी, अशा विक्रीस

लागू झाल्या नव्हत्या, असे गृहीत धरून, व्यापाऱ्याच्या विक्रीवर कलम ३ अंतर्गत कर किंवा करांची आकारणी केली जाईल, आणि असे असले तरीही, व्यापाऱ्याने काढलेला किंवा नूतनीकरण केलेला परवाना, जर असल्यास, वर्षभरात अस्तित्वात होता किंवा अंमलात असेल.

मद्रास सर्वसाधारण विक्री कर (उलाढाल आणि मूल्यांकन) नियम

नियम ४ (१). "पोट-नियम (२) मधील तरतूद वगळता, या नियमांच्या प्रयोजनासाठी एखाद्या व्यापाऱ्याची एकूण उलाढाल ही त्या व्यापाऱ्याने ज्या रकमेसाठी मालाची विक्री केली आहे ती रक्कम असेल.

(२) या नियमांच्या प्रयोजनासाठी खाली नमूद केलेल्या मालाच्या बाबतीत, एखाद्या व्यापाऱ्याची एकूण उलाढाल ही त्या व्यापाऱ्याने ज्या रकमेने माल खरेदी केला आहे, ती रक्कम असेल.

....

(सी) राज्यातील परवानाधारक चर्मशोधनकाराने खरेदी केलेले, न कमावलेले कातडे आणि चर्म, आणि

(डी) कातडे आणि चर्माच्या परवानाधारक व्यापाऱ्याने राज्याबाहेर निर्यात केलेले न कमावलेले कातडे व चर्म.

नियम १५(१). नियम ६ ते १३ हे परवानाधारक चर्मशोधनकारांना आणि कातडे

व चर्माच्या इतर परवानाधारक व्यापाऱ्यांना, कातडे आणि चर्माच्या त्यांच्या व्यवहारांसंदर्भात लागू होणार नाहीत; परंतु, अशा व्ययव्हरांच्या संदर्भात त्यांना यातील आणि खालील नियमातील तरतुदी लागू होतील.

नियम १६ (१). कातडे आणि चर्माच्या बाबतीत कलम ३ (१) अन्वये देय कर या नियमातील तरतुदींनुसार आकारण्यात येईल.

(२) परवानाधारक व्यापाऱ्यांकडून न कमावलेल्या कातडे किंवा चर्माच्या विक्रीवर, ज्या टप्प्यावर अशा कातडे किंवा चर्माची विक्री राज्यातील चर्मशोधनकारांना केली जाते किंवा राज्याबाहेर निर्यातीसाठी विक्री केली जाते त्या टप्प्याचा अपवाद वगळता, कोणताही कर आकारला जाणार नाही ;

(i) राज्यातील चर्मशोधनकारांना विक्री करण्यात आलेल्या, न कमावलेल्या सर्व कातडे आणि चर्माच्या बाबतीत, चर्मशोधनकाराने ज्या रकमेसाठी कातडे किंवा चर्म खरेदी केले आहे, त्या रकमेवर त्याच्याकडून कर आकारला जाईल;

(ii) राज्यातील चर्मशोधनकारांना न विकलेल्या परंतु राज्याबाहेर निर्यात केलेल्या, न कमावलेल्या सर्व कातडे किंवा चर्माच्या बाबतीत, कलम ३(३) अन्वये करा पासून सूट नसलेल्या, राज्यात खरेदी करणाऱ्या अंतिम व्यापारी असलेल्या व्यापाऱ्यावर, त्याने ज्या रकमेसाठी खरेदी केले त्या रकमेवर कराची आकारणी करण्यात येईल.

....

(५) परवानाधारक व्यापाऱ्यांव्यतिरिक्त कातडे किंवा चर्माच्या इतर व्यापाऱ्यांकडून करण्यात आलेली कातडे किंवा चर्माची विक्री, कलम ३ मधील तरतुदींच्या अधीन राहून, विक्रीच्या प्रत्येक प्रसंगी करआकारणीस पात्र असेल."

विक्री कर नियमांच्या नियम ५ (१) मध्ये खालील तरतूद आहे :-

"प्रत्येक व्यक्ती, जी ....

....

....

(ड) कातडे आणि/ किंवा चर्माचा व्यवहार, मग तो चर्मशोधनकार म्हणून असो किंवा अन्यथा, किंवा

....

जर कलम ५ व ८ मध्ये तरतूद केलेल्या सुटीचा किंवा कलम ६ मध्ये तरतूद केलेल्या एकेरी बिंदु कर आकारणीच्या सवलतीचा लाभ घेण्याची त्याची इच्छा असली तर, तो त्याच्या व्यवसायाच्या प्रत्येक ठिकाणाच्या संदर्भातील परवान्याकरिता नमुना १ मध्ये, पोट-नियम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाकडे अर्ज सादर करेल, जेणेकरुन प्राधिकाऱ्यांना त्याच्यापर्यंत दिनांक १५ ऑक्टोबर, १९३९ नंतर नसेल अशा तारखेपर्यंत पोहोचता येईल."

सदर अधिनियमा अन्वये कर आकारणीची योजना अशी आहे की, कलम ३ हे सर्वसाधारण आकारणीचे कलम आहे, ज्या अंतर्गत विक्रेत्याच्या उलाढालीत विहित पद्धतीने कर लादला जातो, यास अपवाद म्हणजे एखाद्या विक्रेत्याची उलाढाल रू १०,०००/- पेक्षा कमी असल्यास त्यास विक्री करातून सूट दिली जाते. कलम ३ मध्ये विक्रेत्याच्या एकूण उलाढालीवर बहुगुणीत कर आकारणीची तरतूद केली आहे. अधिनियमाच्या कलम ५ मध्ये नमूद केलेल्या काही विनिर्दिष्ट वस्तूंच्या विक्री व्यवहाराच्या बाबतीत अपवाद करण्यात आला आहे. त्या कलमा अंतर्गत काही विहित निर्बंध आणि अटींच्या अधीन राहून एकेरी बिंदू कर आकारणीची तरतूद आहे. त्या कलमाच्या पोट-कलम (vi) नुसार, कातडे आणि चर्माची विक्री कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये, क्रमवर्ती व्यापाऱ्यांच्या विक्रीच्या मालिकेतील एकेरी बिंदूवर करास पात्र आहे. परंतु, या कलमाची (क ५ ची) परिभाषा असे दर्शविते की, सदर सुट काही निर्बंध आणि अटींच्या अधीन लागू आहे, ज्यामध्ये परवान्याच्या अटींचा समावेश आहे. परवान्या संबंधी जो नियम आहे तो नियम म्हणजे विक्री कर नियमांतील नियम ५, ज्याचा संबंधित भाग यापूर्वीच नमूद केला आहे. त्यात असे नमूद केले आहे की, जर एखाद्या विक्रेत्याला कलम ५ किंवा ८ मध्ये नमूद केलेल्या सुटीचा लाभ घ्यावयाचा असेल किंवा कलम ५ मध्ये नमूद केलेल्या कर आकारणीच्या सवलतींचा लाभ केवळ एकेरी बिंदू नुसार घ्यावयाचा असल्यास, तर त्याने त्या नियमात विहित केल्यानुसार परवाना प्राप्त करणे आवश्यक आहे. जर कलम ५ मध्ये विचारात घेतलेले निर्बंध आणि

अटी व त्यासह नियमांची पूर्तता न केल्यास, अधिनियमाच्या कलम ६ अ च्या नुसार काही परिणाम होतात. ज्यात असे निर्दिष्टपणे नमूद केले आहे की, जेथे विहित अथवा अधिसूचित केलेल्या अटीनुसार परवाना काढणे किंवा त्याचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे, तेथे अशा अटींचे किंवा निर्बंधांचे उल्लंघन केल्यास, कलम ३ अंतर्गत कर अशा प्रकारे लादण्यात यावे की जणू अशा विक्रीसाठी कलम ५ च्या तरतुदी लागू नव्हत्या. त्यामुळे परवाना प्राप्त करण्याच्या अटीचे पालन करण्याच्या अटीवर कातडे आणि चर्माच्या विक्रीवर एकेरी बिंदु कर लादण्याची ही स्पष्ट तरतूद आहे.

उलाढाल आणि मूल्यांकन नियमांचा नियम १६ (५) आणि अधिनियमाचे कलम ५(vi) मधील विसंगतीचा युक्तिवाद जो उच्च न्यायालयात स्वीकारला होता, त्यास त्या कलमाच्या, ज्यात कातडे आणि चर्माच्या विक्रीस करासाठी पात्र करण्यासाठी सवलतीची तरतूद आहे, त्याच्या परिभाषेतून कोणताही आधार मिळत नाही ; परंतु ते, जसे कलमाचे सुरुवातीचे शब्द दर्शवितात, नियमांमध्ये विहित केलेल्या निर्बंध आणि अटींच्या अधीन आहे आणि या अटींपैकी एक अट म्हणजे परवाना घेणे. नियम १६ (५) हे अटींचे पालन न केल्यावर होणाऱ्या परिणामांवर भर देते, ज्या कलम ५ (vi) आणि ६ अ मध्ये स्पष्ट शब्दांत विहित करण्यात आल्या आहेत. आम्हाला नियम आणि अधिनियमांच्या कलमांमध्ये कोणतीही विसंगती आढळली नाही. परंतु असे सादर निवेदन करण्यात आले की, या न्यायालयाने मद्रास उच्च न्यायालयाच्या एका न्यायनिर्णयातून उद्भवलेल्या एका अपिलामध्ये, नियम १६(५) अधिनियमाच्या

अधिकाराबाहेरच्या असल्याचा निर्णय दिला होता. हा युक्तिवाद व्ही. एम. सय्यद मोहम्मद अँड कंपनी वि. मद्रास राज्य[१] या प्रकरणामध्ये मद्रास उच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयावर आधारित आहे, जो या न्यायालयाने[२] अपीलामध्ये कायम केला होता. हा युक्तिवाद सुस्थित नाही. त्या प्रकरणात, जेव्हा ते मद्रास उच्च न्यायालयात होते तेव्हा असा युक्तिवाद करण्यात आला होता की, या अधिनियमाच्या मुळाशी असलेले धोरण म्हणजे कातडे आणि चर्म यांच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेसाठी स्पर्धात्मक पातळीवर ठेवणे होते, ते नियमांनी योग्यरीत्या पार पाडले नव्हते. तेथे असा युक्तिवाद करण्यात आला की, कातडे आणि चर्म या वस्तूंना परदेशी बाजारपेठेत खूप मागणी होती आणि त्यांची निर्यात हे मद्रास राज्याच्या विदेशी व्यापारातील मुख्य वस्तूंपैकी एक होते, ज्याला "अवरम बार्क" (झाडाची साल) च्या मुबलक पुरवठ्यामुळे, जे या उद्देशासाठी विशेषतः उपयुक्त होते, त्यामुळे चर्मशोधना मध्ये लक्षणीय नैसर्गिक फायदा झाला. असा युक्तिवाद देखील करण्यात आला की, न कमावलेले (टॅन न केलेले) कातडे आणि चर्म स्थानिक पातळीवर किंवा इतर राज्यातून आयात करून प्राप्त केले गेले आणि ते एकतर राज्यात कमावले (टॅन केले) गेले किंवा निर्यात केले गेले आणि त्यामुळे कर आकारणीची योजना एकेरी बिंदूवर, म्हणजेच जेव्हा वस्तू राज्यात कमावण्यात आल्या किंवा कमावण्यासाठी परदेशात निर्यात केल्या गेल्या त्या टप्प्यावर, कर आकारणी

१. (१९५२) ३ एस. टी. सी. ३६७.

२. व्ही. एम. मोहम्मद अँड कंपनी वि. आंध्र राज्य [१९५४] एस. सी. आर. १११७.

करण्याची होती. या कारणास्तव बहुमुखी कर आकारणी ही अधिनियमाच्या कलम ५(vi) चे उल्लंघन करणारी होती. असे दिसून येते की, सरकारने यावर असहमती दर्शविली नाही आणि त्यामुळे असा निर्णय देण्यात आला की, उलाढाल आणि मूल्यांकन नियमांचा नियम १६(५) अधिकारबाह्य होता. पण, वेंकटरामा अय्यर, न्या. यांनी पृष्ठ ३९४ वर सांगितल्याप्रमाणे प्रश्न या मुद्द्याशी संबंधित नाही, जेथे त्यांनी असे नमूद केले होते :-

"आता याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद असा आहे की, जेथे विनापरवाना व्यापाऱ्यांकडून परवाना नसलेल्या चर्मशोधनकारांना किंवा विना परवाना व्यापाऱ्यांना विक्री करण्यात येते, तेव्हा तेथे बहुमुखी कराची आणि कलम ५ (vi) चे उल्लंघन होण्याची शक्यता असते. नियम १६ (५) हे कलम ५ (६) च्या विरुद्ध आहे, याबाबत सरकारच्या वतीने वाद नाही. त्यामुळे तो अधिकारबाह्य मानला पाहिजे. परंतु यामुळे याचिकाकर्त्यांना कोणताही दिलासा मिळू शकत नाही, कारण ते सर्व परवानाधारक चर्मशोधनकार आहेत आणि नियम १६ (५) च्या अंमलबजावणीमुळे त्यांना कोणत्याही प्रकारे त्रास होत नाही आणि हे याचिकाकर्त्यांच्या विद्वान वकिलांनी मान्य केले होते."

त्यानंतर हे प्रकरण अपीलामध्ये या न्यायालयात आणले गेले आणि एस. आर. दास, न्या. (जे ते तेव्हा होते) यांनी पृष्ठ क्र. ११२१ वर खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले:-

"शेवटी, विद्वान वकील विनंती करतात की, नियम १६ (५) हा अधिनियमाच्या कलम ५ (vi) मधील तरतुदींचे स्पष्टपणे उल्लंघन करतो. हा पोट-नियम उच्च न्यायालयाने अधिकारबाह्य ठरवला आहे आणि खरे तर मद्रासच्या विद्वान महाधिवक्त्यांनी उच्च न्यायालयात नियम १६ (५) हा कलम ५ (vi) च्या विरुद्ध आहे असा वाद, जो आमच्यासमोर उपस्थित केला, तो उपस्थित केला नाही. मात्र, त्या पोट-नियमामुळे केवळ विनापरवाना व्यापारीच बाधित होतात आणि परवानाधारक व्यापारी त्या पोट-उपनियमामुळे बाधित होत नाहीत."

या न्यायनिर्णयातून असे दिसून येत नाही की, नियमाची प्रतिकूलता विवादित होती किंवा न्यायालयाने गुणवत्तेवर आपले मत व्यक्त केले किंवा तसे करणे आवश्यक होते.

त्यानंतर विद्वान महा न्यायअभिकर्ता यांनी आमच्यासमोर असा युक्तिवाद केला की, उच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिशपथपत्रात अपीलकर्त्यांनी ही स्थिती मान्य केली होती की, उलाढाल व मूल्यांकन नियमांतील नियम १६ (५) हा अधिकारबाह्य होता. परंतु, यामुळे हे प्रकरण पुढे जाणार नाही, कारण अधिनियमातील तरतुदींच्या रचनेनुसार प्रतिकूलतेचा हा युक्तिवाद टिकण्याजोगा नाही.

सय्यद मोहम्मद अँड कंपनी वि. आंध्र राज्य[१] या प्रकरणात, नियम १६ (५) हा अधिकारबाह्य होता हा नियम आखून देणाऱ्या प्राधिकाऱ्यांचा दृष्टिकोन आंध्र प्रदेश उच्च

१. [१९५६] ७ एस. टी. सी. ४६५, ४७२.

न्यायालयाने योग्यरीत्या स्वीकारला नव्हता. म्हैसूर राज्य वि. सर्वतुला आणि कंपनी[१] या प्रकरणात म्हैसूर उच्च न्यायालयाने हाच दृष्टिकोन व्यक्त केला होता.

या अधिनियमातील संबंधित तरतुदी व त्याअंतर्गत करण्यात आलेले नियम विचारात घेता असे दिसून येते की, ज्या कलमाखाली आकारणी केली जाते ते कलम ३(१) आहे आणि सर्वसाधारण नियम म्हणजे व्यापाऱ्याच्या एकूण उलाढालीवर अनेक ठिकाणी कर आकारणी करणे असा आहे, परंतु काही विशिष्ट वस्तूंच्या विक्रीच्या बाबतीत अंतर करण्यात आले आहे आणि परवान्याच्या बाबतीत काही अटी आणि निर्बंध, जे कलम ५ मध्ये नमूद केले आहेत आणि नियमांमध्ये देखील नमूद केलेले आहेत, त्यांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून एकेरी बिंदूवर कर आकारला जातो आणि की उलाढाल व मूल्यांकन नियमांचा नियम १६ (५) अधिकारबाह्य नाही.

त्यानंतर असा युक्तिवाद करण्यात आला की, परवानाधारक व्यापाऱ्यांच्या आणि चर्मशोधनकारांच्या बाबतीत एकाच ठिकाणी परवाना व कर आकारणी करण्याची आणि विनापरवाना व्यापाऱ्यांच्या बाबतीत एकापेक्षा अधिक ठिकाणी कर आकारणी करण्याची तरतूद राज्यघटनेच्या अनुछेद १४ चे उल्लंघन करणारी आहे. पण हा मुद्दा आम्ही मान्य केला नाही, कारण तो उच्च न्यायालयात उपस्थित करण्यात आला नव्हता आणि या न्यायालयात प्रथमच उपस्थित करण्यात आला होता. आमच्या मते, नियम १६(५) च्या

अधिकारबाह्य स्वरूपाबाबत आणि अधिनियमाचे कलम ६ अ हे लागू न करण्याच्या बाबतीत उच्च न्यायालयाने दिलेला न्यायनिर्णय चुकीचा होता आणि त्यामुळे अपील मंजूर केले पाहिजे, उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय व आदेश रद्द करण्यात आला आणि उत्तरवादीची याचिका फेटाळण्यात आली. अपीलकर्त्यांचा या न्यायालयातील आणि कनिष्ठ न्यायालयातील खर्च उत्तरवादी अदा करतील.

अपील मंजूर.

१. [१९५७] ९ एस. टी. सी. ५९३.

x-x-x-x

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x